**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विशेष सर्व साधारण सभा**

मंगळवार दि. ७.७..२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तरराव | सातोलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कोकाटे नागाबाई भुजंगराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | बियाणी प्रविण बालाप्रसाद |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खा इलियाज खॉ |
| मुंढे शांता मोतीराम | आन्नेवार गंगासागर संदिप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| खेडकर प्रमोद मुरलीधरराव | कनकदंडें मोहिनी महेशराव |
| वाजेदा तबसुम अथर अली खॉ | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| चव्हाण श्रध्दा सुशिल | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| जिंदम पार्वती व्यंकटेश | उमरेकर अशोक रावन |
| मुदिराज कमलाबाई रामस्वामी | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजियाबेगम अयुबखान | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बाळासाहेब गंगाधराव |
| स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपत गुणाजील | अनुजा अमितसिंह तेहरा |
| शर्मा पुष्पाताई राजेश | ज्योती महेंद्र खेडकर |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | अ.फसीया फिरदोरस |
| अ.सत्तार अ.गफुर | स.शेर अली स.महेबुब अली |
| कुरेशी चॉंदपाशा खाजा | फारुख हुसेन कासिमसाब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चावुस हसिनाबेगम साबेर |
| अ.लतिफ अ.मजीद | गुरुखूदे सुंदरलाल किशनलाल |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला | रावत दिपकसिंह काशिनाथसिंह |
| अन्नपुर्णा जम्मूसिंह ठाकूर | किशोर यादव |
| सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ | गायकवाड वैजयंती भिमराव |
| मोरे संजय गंगाधरराव | अभिषेक सौदे |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमूख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | येवनकर विजय हिरांचद |
| कदम विश्वास बालाजी | अड.बन शाम वामनराव |
| काबरा रामनाराण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी या होत्या, हे होते. तसेच श्री सुशील खोडवेकर,आयुक्त,

श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त बिएसयपी, श्री प्रमोद येवले, उपआयुक्त,(प्रशासन), डॉ.असिफ, प्र. मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री आर.एस.कोलगणे, श्री सादीक खान. प्र. मुख्य लेखाधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य, श्री अंधारे, अभियंता, इतर अधिकारी, महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**सरजितसिंघ गिल** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी स.सदस्य श्री अरविंद भारतीया यांच्या मातोश्रीचे भारतीया यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना भावुपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**गफार खान** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. तसेच महाराष्टातील जेष्ठ नेते व माजी मंत्रीअजित घोरपडे यांचेही दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांनाही भावुपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** महानगरपालिकेचे माजी स.सदस्य श्री अरविंद भारतीया यांच्या मातोश्रीचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना तसेच राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते अजित घोरपडे यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र. १७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे माजी स.सदस्य अरविंद भारतीया यांच्या मातोश्रीचे दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र. १८** **ठराव**

महाराष्ट्रातील जेष्ठ नेते, माजी मंत्री अजित घोरपडे यांचे दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत Udaan mega व Safe City Project हे प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वीत असून या प्रकल्पांना केंद्र व राज्य शासनातर्फे विविध पारितोषीके देवून गौरविण्यात आलेले आहे.नांदेड शहराचा या आधी जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण योजनेत समावेश होता.गुरु ता गध्दी सोहळयाच्या निमित्याने शहरात अनेक विकास कामे करण्यात आली आहेत.

केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेत देशातील १०० शहराचा समावेश करण्यात येणार असून त्यामध्ये महाराष्ट्रातील १० शहराचा समावेश करण्यात येणार आहे. नवी दिल्ली येथे स्मार्टसिटी संदर्भात दोन दिवशीय बैठकीला मा.महापौर सौ.शैलजा स्वामी व आयुक्त श्री सुशिल खोडवेकर हे उपस्थित होते.

नांदेड शहर हे स्मार्टसिटी योजनेत समाविष्ट होण्यासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा व मनुष्यबळ महानगरपालिकेकडे उपलब्ध्द आहे.तसेच नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश होण्यासाठी आवश्यक त्या अटी व शर्तीचे पालन करुन त्या पुर्ण करण्यासाठी पदाधिकारी व प्रशासनाचे वतीने प्रयत्न सुरु असून जास्तीत जास्त कामे पुर्ण करण्यात येणार आहेत.या सर्वाच्या माध्यमातून नादेड शहर स्मार्टसिटी म्हणून ओळखले जाईल तसेच नांदेड शहराची ओळख स्वच्छ सुंदर व सुरक्षित शहर यासोबतच स्मार्टसिटी म्हणून करण्याचा मानस आहे. याकरीता आवश्यक ते निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मा.महापौर व आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देणे बाबत.

**अशोक उमरेकर** मा.महापौरांनी नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्याचे विषयाकरीता आजची विशेष सभा बोलाविली आहे.नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश झाल्यास नांदेड शहराचा विकास होईल म्हणून सर्व पक्षाचे नगरसेवक व शहरातील नागरीक या प्रस्तावाचे समर्थन करीत आहेत स्वागत करीत आहे परंतु मागील तीन चार दिवसापासून स्मार्टसिटी बाबत निर्णय धेण्याचे अधिकार महापौर आयुक्त यांना देण्याचे सदंर्भात काही प्रश्न निर्माण होत आहे.नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश होण्यासाठी महापौर व आयुक्त हे दिल्ली येथे जावून प्रयत्न करीत आहे. महापौराना,आयुक्तांना अधिकार देण्याचे देण्याचे अनुषंगाने सभागृहात समाधानकारक खुलासा करण्यात यावा.

**प्रमोद खेडकर** नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश होण्यासाठी महापौर व आयुक्त हे दिल्ली येथे गेले होते दिल्ली येथे काय चर्चा झाली त्याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

**विनय पाटील** स्मार्टसिटी करीता आयुक्त साहेब जपानलाही गेले होते त्यांनी कोणकोणत्या शहराची पाहणी केली याचीही माहिती द्यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश झाल्यानंतर त्याचा नांदेड शहरास काय फायदा होणार आहे. नागरीकांवर काही कराचा बोजा पडणार आहे काय याबाबत सविस्तर खुलासा सभागृहात करण्यात यावा.

**रामनारायणजी काबरा** नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश व्हावा अशी सर्व नगरसेवकांची शहरातील जनतेची इच्छा आहे. परंतु केंद्र शासनाच्या या योजनेचा खुलासा झाला पाहिजे. केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी निर्णयामध्ये एसपीव्हि कंपनी स्थापन करण्याचा उल्लेख असल्यामूळे स्मार्टसिटीची अमलबजावणी या कंपनीमार्फत होणार आहे काय ,केद्र व राज्य शासनाकडून कशाप्रकारे निधी मिळणार आहे महानगरपालिकेचा किती वाटा राहील महानगरपालिकेवर किती बर्डन पडणार आहे,स्मार्टसिटी करीता उत्पन्न दिलेले आहे त्यानुसार उत्पन्न वाढीसाठी आपणास काय करावे लागेल.योजनेतील कामे निश्चित करणे ,त्याचे अंदाजपत्रक तयार करणे ई. याकरीता पॅनल एक्सपर्ट नेमावा लागेल काय एक्सपर्टची नेमणूक केंद्र शासन करणार आहे काय कशा प्रकारे रिफार्म करावे लागेल, याबाबतवचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**श्रध्दा चव्हाण** नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश होणार किंवा नाही याबाबत शहरातील नागरीकामध्ये व नगरसेवकामध्ये उत्सुकता लागून राहिलेली आहे. स्मार्टसिटीमूळे शहरात वेगवेगळी विकासाची कामे होणार आहे.स्मार्ट सिटीचे काम करण्यासाठी महानगरपालिकेतील अनुभवी व अभ्यासु उपआयुक्त श्री रत्नाकर वाघमारे यांना संधी देण्यात आली त्याबध्दल मी श्री रत्नाकर वाघमारे यांचे अभिनंदन करते. या स्मार्टसिटी चा प्रोंजेक्ट कसा आहे यामध्ये काय काय प्रोव्हीजन आहे नागरीकांचे प्रश्न कसे सुटणार आहे. याचे आम्हाला १०० टक्के पुर्ण पटेल असे उत्तर दिले तर आम्हाला शहरातील नागरीकांना उत्तर देता येइल.

**दिपकसिंह रावत** नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश होतो किंवा नाही याबाबत नागरीकांमध्ये मोठी उत्सुकता लागलेली आहे. नुकतेच महापौर व आयुक्त साहेब दिल्लीला जावून आलेले आहे. त्या अनुषगाने नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश करणेसाठी आजची विशेष सभा बोलाविलेली आहे.आयुक्त साहेबांनी प्रशासकीय बाब अत्यंत चांगला निर्णय घेवून स्मार्टसिटीचा चार्ज श्री रत्नाकर वाघमारे ,उपआयुक्त यांना दिल्याबध्दल मी आयुक्त साहेबाचे अभिनंदन करतो. आजच्या सभेत स्मार्टसिटी बाबत आयुक्त व महापौरांना अधिकारा देण्याबाबतचा प्रस्ताव आहे केंद्र शासनाने स्मार्टसिटी म्हणून निवड करण्यासाठी जे काही निकष ठरविलेले आहे ते काय आहेत क्राईड ऐरिया काय निश्चित केलेला आहे. याची माहिती देण्यात यावी.१०० गुणाचे जे १३ प्रश्न विचारण्यात आलेले आहे त्यामध्ये आपण मेरिटमध्ये कसे काय येवू शकतो ,मेरिटीमध्ये आपण बसु शकतो काय याचा खुलासा संबंधित अधिका-यांनी करावा. महानगरालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४४ नुसार प्रत्येक सदस्यांना सभेत आपले विचार मांडण्याचे अधिकार आहे त्याचा वापर करुन सर्व स.सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी देण्यात यावी. त्यानंतर या विषयावर निर्णय घेण्यात यावा.

**बाळासाहेब तरोडेकर** आमचे शिवसेनेचे जेष्ठ सदस्य श्री दिपकसिंह रावत यांनी स्मार्टसिटी बाबत चांगली माहिती दिली .केद्र शासनाने शहराचे सौदर्य कसे वाढेल शहराचा विकास कसा होईल या अनुप्रंगाने महत्वाचे १३ प्रश्न विचारलेले असून त्याचे उत्तर आपणास शोधावे लागणार आहे. सर्वात प्रथम शहरात स्वच्छता आहे काय .आज शहरात शिक्षण, आरोग्य, उद्योग, ई.सुविधा आहे परंतु महानगरपालिकेकडे कच-याचे नियोजन नाही. डम्पींग नाही. तुप्पा येथील घन कच-याचा प्रकल्प अद्याप सुरु झालेला नाही.तो प्रकल्प सुरु होणार आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा. नांदेड शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश करण्यासाठी शहराची पाहणी करण्याकरीता केंद्र शासनाची टिम येणार असून त्यांना या संदर्भात काय उत्तर देणार.स्मार्टसिटीमध्ये येण्यासाठी आपण कमी पडू नये. केंद्रात व राज्यात भाजप शिवसेनेची सत्ता आहे. नांदेड जिल्हयात शिवसेनेचे ४ आमदार व एक भाजपचा आमदार निवडून आलेला असून नांदेड जिल्हयाचे पालकमंत्री ना.श्री दिवाकरजी रावते साहेब,नांदेडचे शिवसेनेचे आमदार श्री हेमंत पाटील यांना शहराचा स्मार्टसिटी मध्ये समावेश होण्यासाठी विश्वासात घेवून त्यांचेही सहकार्य घेणे आवश्यक आहे जेणे करुन तेही राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडवणीस यांचेकडे व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करतील.नादेड शहराची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी त्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**गफार खान** नगरसचिवानी प्रस्तावाचे वाचन केलेले असून स्मार्टसिटीचे अधिकार महापौर व आयुक्तांना देण्याचा प्रस्ताव सभेपुढे सादर करण्यात आलेला आहेयाबाबतीत विरोधीपक्ष नेत्याची काय भूमिका आहे ती त्यांनी स्पष्ट करावे.

**बालाजी देशमूख** नांदेड शहराचा सर्वागीण विकास व्हावा, शहर सुदंर व्हावे या दृष्टीकोनातून स्मार्टसिटी मध्ये समावेश करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याचा विषय सभागृहासमोर मांडला त्याबध्दल मी शिवसेना पक्षाचे जेष्ठ नेत्याचे वतीने महापौरांचे आभार मानतो. नांदेड शहराचा स्मार्टसिटीमध्ये समावेश करण्यासाठी शिवसेना पक्षाचे पुर्ण समर्थन आहे.परंतु महापौर व आयुक्त यांना अधिकार देण्याचा जो

प्रस्ताव आहे त्यास शिवसेना पक्षाचा पुर्ण विरोध आहे.आयुक्त व महापौरांना अधिकार कशा करीता द्यावयाचे पुर्ण स्मार्टसिटीचे सर्वप्रस्ताव मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवावे.सभेच्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**महापौर** स्मार्टसिटी योजनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने निमंत्रीत केल्यानुसार मी व आयुक्त दि.२५ व २६ जून रोजी दिल्ली येथे गेलो होतो. देशातील इतरही महानगरपालिकेचे महापौर,आयुक्त आले होते. देशाचे पंतप्रधानानी दि.२५जून रोजी शहरासाठी अटल क्षेत्र सुधार (रिट्रोफिटीग), अमृत पुर्नविकास आणि हरित क्षेत्र विकास या तीन योजनेचे सादरीकरण (लॉन्च) केले. दिल्ली येथे देशातील विविध महानगरपालिकेने आपल्या शहरासाठी ज्या विविध योजना राबविल्या त्यांचे प्रेझेनटेशन दाखविण्यात येवून योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली, नागपुर महानगरपालिकेने राबविलेली पाणी पुरवठा योजना,सुरत महानगरपालिकेने घन व्यवस्थापन अंतर्गत कचरा प्रकल्पाची माहिती देण्यात आली.मा.खा.श्री अशोकरावजी चव्हाण यांचे मार्गदर्शनानुसार

दिल्ली येथे आलेल्या देशातील इतर महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर याची भेट घेवून त्यानी नागरीकाकरीता राबविलेल्या विविध योजनाची माहिति घेतली असता असे दिसून आले की, या सर्व महानगरपालिकेपेक्षा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नागरीकांसाठी अत्यंत चांगल्या योजना राबविलेल्या आहेत.त्यामूळे केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेमध्ये नांदेड शहराचा समावेश नक्कीत होईल असा मला विश्वास आहे.

केंद्र शासना मार्फत नागरीकांचे जिवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करणेसाठी स्मार्टसिटी अभियान या महत्वकांक्षी अभियानाची घोषणा मा.पंतप्रधान यांचे हस्ते करण्यात आली त्या अनुषंगाने स्मार्टसीटी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार या अभियानाच्या पहिल्या टप्यात स्पर्धात्मक पध्दतीने निवड करावयाच्या शहरामध्ये नांदेड शहराचा समावेश करण्यासाठी द्यावयाची माहिती हि १० जूलै २०१५ पर्यत तयार ठेवावयाची आहे.

सदरील योजनेच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने विहित गुणांक तक्ता दिलेला आहे त्याची माहिती प्रशासनामार्फत सभागृहास देण्यात येईल.स्पर्धात्मकरित्या १०० गुणापैकी जास्तीचे गुण प्राप्त करणा-या शहराची स्मार्टसिटी मध्ये निवड होणार आहे.

नांदेड शहर हे गुणांकामध्ये जास्तीचे गुण प्रापत करण्याची व निवडीची शक्यता नाकारतो येत नाही. या शिवाय पूर्व तयारी अंतर्गत पाच वर्षाचे कालावधीकरीता प्रतिवर्ष रु.५० कोटी एवढा निधी स्वहिस्सा म्हणून देवू शकते या बाबत महानगरपलिकेस नियोजनाचा तपशिल देणे आवश्यक आहे.

सदरील योजना अभियाना अंतर्गत नागरीकांचा सहभागाबाबत महानगरपालिकेने नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच स्मार्टसिटी अमलबजावणी बाबतचामहानगरपालिकेचा दूरदृष्टीकोन (व्हिजन) सुध्दा सादर करणे आवश्यक आहे.

करीता आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेत नांदेड शहराचा समावेश करण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनास शिफारस करण्यासाठी मान्यता देण्यात यावी अशी विनंती आहे.

**उपआयुक्त बिएसयुपी** केंद्र शासनामार्फत प्रमूख शहरात प्रमाणात होत असलेले वाढते नागीकरण व वाढत्या लोकसंख्येस पुरवावयाच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वत:चे उत्पन्न सातत्याने कमी पडत असल्यामूळे केंद्र शासनाने शहराचा विकास व्हावा,नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द व्हाव्यात म्हणून २५ जून २०१५ रोजी अटल क्षेत्र विकास,अमृत पुर्नरविकास आणि शहरी ग्रृह निर्माण विकास अशा तीन योजना घोषित केलेल्या असून यामध्ये केंद्र शासनाचा ३ लाख कोटीचा संकल्प आराखडा आहे. स्मार्टसिटी अटल क्षेत्रविकास अंतर्गत देशातील १०० शहराची व अमृत पुनर विकास योजने अंतर्गत एक लाखपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ५०० शहराची निवड करण्यात येणार आहे. केंद्र शासन १०० शहराकरीता १ लाख कोटी निधी ,व अमृत पुनर विकास योजनेत ५०० शहराकरीता १ लाख कोटीचा निधी उपलब्ध्द करुन देणार आहे.अटल व अमृत या दोन्ही योजना जवळपास सारख्याच असून फरक एवढाच आहे की, १०० शहराकरीता १ लाख कोटीचा निधी व ५०० शहराकरीता १ लाख कोटीचा निधी मिळणार आहे. यामध्ये केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासन २५ टक्के व स्थानिक स्वराज्य संस्थेचा २५ टक्के वाटा राहणार आहे.स्थानिक स्वराज्य संस्था आपला वाटा स्वत: च्या उत्पन्नातून किंवा प्रायव्हेट पार्टीसिपिंट करुनही निधी उभारु शकते.यामध्ये स्थानिक संस्थांना दरवर्षी ५० कोटी याप्रमाणे पाच वर्षात २५० कोटीचा निधी उभारण्याचा प्रश्न आला. परतु १०० शहराकरीता १ लाख कोटी व ५०० शहरासाठी १ लाख कोटीचा निधी मिळणार आहे..प्रकल्पाच्या किंमतीनुसार वाटा कमी अधिक होवू शकतो.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ७-८ वर्षात गुरु ता गद्दीच्या मध्यमातून जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत नागरी सुविधाची उंची निश्चितच वाढविलेली आहे.त्यामूळे निश्चितच नांदेड शहराचा १०० स्मार्टसिटी मध्ये समावेश होणार आहे.आणि १०० मध्ये निवड झाल्यास निश्चितच जास्तीचा निधी मिळणार आहे. १०० शहराची निवड ही स्पर्धात्मक पध्दतीने होणार आहे या स्पर्धेकरीता केंद्र शासनाने १०० मार्काची १३ नॉर्म्सची प्रश्नावली तयार केलेली आहे. महानगरपालिकेने फार्म नंबर दोन मध्ये आपली माहिती भरुन राज्य शासनास सादर करावयाची आहे.महाराष्ट्र शासनास स्मार्टसिटी अटल क्षेत्रविकास अंतर्गत स्पर्धेव्दारे राज्यातील ४४ शहरापैकी १० शहराची निवड करुन केंद्र शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे.स्मार्टसिटीमध्ये शहराची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने नॉर्म्स (प्रश्न) ठरविलेले आहे असून ते नॉर्म्स प्रपत्र क्र.२ मध्ये भरुन राज्य शासनास सादर करावयाचे असून १०० गुणाचे १३ प्रश्न आहेत.

**1) २०११ च्या जनगणनेनुसार किंवा स्वच्छ भारत अभियानानंतर खाजगी शौचालयाचे संख्येत झालेल्या वाढीची टक्केवारी गुण –(१०),**

२०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार त्यावेळेस शहरात कोणाच्या घरात शौचालय आहे कोणाच्या घरात नाही याचा सर्व्हे झालेला असून २०११ च्या जनगणनेपासून अथवा शहर स्वच्छता अभियान लागू करण्यात आलेल्या तारखेनपासून आजपर्यत शहरात किती टक्यांने शौचालयाचे संख्येत वाढ झाली.१० टक्के पेक्षा अधिक वाढ झाली असेल तर १० मार्क ,७.५ ते १० टक्के पर्यत वाढ झालेली असेल तर ७.५ मार्क व ५ ते ७.५ टक्के वाढ झालेली असेल तर ५ मार्क मिळणार आहे.

नांदेड शहरामध्ये उघडयावर शौचालयास जाण्याची प्रथा खुपच कमी आहे. बिएसयूपी योजने अंतर्गत १६ हजार घराचे बांधकाम करण्यात आले त्या सर्व घरामध्ये शौचालयाचे बांधकाम करण्यात आलेले असल्यामूळे महानगरपालिका हध्दीत २०११ नंतर किंवा स्वच्छ भारत अभियानाचे तारखेपासून आज पर्यत निश्चितच शहरातील शौचालयाची संख्या १० टक्के पेक्षा अधिक वाढलेली असल्यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस निश्चितच १० गुण मिळतील.

**2) ऑनलाईन तक्रार निवारण प्रणाली गुण-(५).**

नागरीकांना त्यांच्या वेगवेगळया प्रकारच्या सुविधा करण्यासाठी आपल्या तक्रारी ऑन लाईन देता आल्या पाहिजे व याकरीता नागरीकांना प्लेटफार्म उपलब्ध्द करुन त्यांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. जो पर्यत आपण लेखी तक्रार स्वीकारण्याचे बंद करणार नाही तो पर्यत नागरीक ऑन लाईन तक्रार करणार नाही परंतु नागरीकांना हळुहळु याची सवय लावून नागरीक ऑन लाईन तक्रार करुन शकतील. मागील दोन वर्षापासुन महानगरपालिकेने आपली संकेत स्थळ (वेबसाईट) सुरु केलेली असून वेगवेंगळया प्रकारचे फार्मेट तयार करुन नागरीकांच्या तक्रारी, वेगवेगळया प्रकारची कामे करण्यासाठीचे अर्ज ऑनलाईन स्विकारुन तक्रारी अर्ज निकाली काढण्यात येत आहे. या प्लॅटफार्मचा जास्तीत वापर करण्यासाठी नागरीकांचा सहभाग असणे आवश्यक असून नागरीकांना या प्लॅटफार्मचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आवाहन करण्यात आलेले आहे.मागील दोन वर्षापासून महानगरपालिकेने आपली वेबसाईट सुरु करण्यात आलेली असल्यामूळे महानगरपालिकेस पुर्ण ५ गुण मिळतील.

**3) महानगरपालिकेने विविध सेवा विषयक कामाची ई न्युज लेटर पेपर प्रसिध्द करणे. गूण-(५)**

महानगरपालिकेच्या संदर्भात वृत्तपत्रात चांगल्या वाईट बातम्या प्रसिध्द होतात परंतु केंद्र शासनाने अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की,महानगरपालिकेने स्वत:हून महिण्यातून एकदातरी नागरीकांकरीता केलेल्या कामाचे बातमी वृत्तपत्रात व वेबसाईट वर प्रसिध्द केली पाहिजे. आयुक्त साहेबांनी १५ दिवसाचा ग्राफ तयार केलेला असून आजच्या सभेचा निर्णय झाल्यांनतर तो ग्राफ वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यावर पहिला मॅसेज आयुक्त व महापौरांचा असेल. याचेही मार्क मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**4) इलेक्ट्रोनिक स्वरुपात महानगरपालिकेचे वार्षिक अर्थसंकल्प महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे, गूण-(५)**

नागरीकांना महानगरपालिकेचे अर्थसंकल्प वेब साईट वर पाहता आले पाहिजे ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मागील तीन वर्षापासून महानगरपालिकेचा अर्थसंकल्प महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर लिंक केलेले आहे.कोणतीही व्यक्ती महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर मागील तीन वर्षाचे महानगरपालिकेचे उत्पन्न व खर्च, कोणत्या शिर्षकात किती तरतूद करण्यात आली हे पाहु शकतात त्यामूळे आपणास पुर्णच्या पुर्ण ५ गुण मिळण्याची शक्यता आहे.

**5) निर्वाचित नगरपालिकाचा स्मार्टसिटीमध्ये समावेश करण्याचा संकल्प**

केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेत समावेश व्हावा म्हणून महानगरपालिकेने ठराव पास करणे आवश्यक असल्यामूळे महानगरपालिकेचे आजची विशेष सभा बोलाविण्यात आलेली आहे.

**6) शहरातील नागरीकांचा स्मार्टसिटी योजनेत समावेश होण्यासाठी शहरातील नागरीकांची सहमती व त्यांचा सहभाग.**

शहरातील नागरीक स्मार्टसिटी अंतर्गत सुविधाचा लाभ घेणार आहे ज्याचे वर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे त्यांनी सुध्दा इच्छा व्यक्त केली पाहिजे की. माझे शहर स्वच्छ व सुंदर झाले पाहिजे,त्यांचाही यामध्ये सहभागअसणे आवश्यक आहे, म्हणून मा.महापौर व आयुक्तांच्या स्वाक्षरीने सर्व स.सदस्यांना लेखी पत्र देवून आपल्या प्रभागातील नागरीकांची बैठक घेवून त्याची संमती मिळवावी अशी विनंती केली होती त्यानुसार स.सदस्यांनी आपल्या प्रभागातील नागरीकांची बैठक धेवून नांदेड शहर स्मार्टसिटी बनविण्यात आम्ही सहभागी होण्यास वचनबध्द असल्याचा ठराव पारीत केलेला आहे.

**7) नागरीकांना विहित कालावधीत सुविधा उपल्बध्द करुन न दिल्यास दंड आकरणे गुण-(५)**

महाराष्ट्र शासनाने नुकताच सेवा संदर्भात अधिनियम प्रसिध्द केलेला असून या अधिनियमानुसार नागरीकांना विहित कालावधीत सेवा देणे बंधनकारक आहे तसेच नागरीकांना विहित कालावधीत सेवा दिली नाहीतर संबंधित दायीत्व असलेल्या अधिका-यांना दंड लावण्याची तरतूद अधिनियमात तरतूद आहे.नागरीकांचे माहितीसाठी या अधिनियमाची तसेच या अधिनियमानुसार विहित कालावधीत कोणकोणत्या सेवा देण्याचे बंधनकारक आहे त्याची व दंडाची तरतूदीची माहिती स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून तो प्रसिध्द करण्यात येईल. याचेही ५ गुण महानगरपालिकेस मिळण्याची शक्यत आहे. मिळेल.

**8) सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या तीन आर्थिक वर्षात महानगरपालिकेस प्राप्त झालेले महसुली उत्पन्न गुण - १०**

सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या तीन वर्षात महानगरपालिकेस मालमत्ता कर,पेनाल्टी,शुल्क,चार्जेस या पासुन झालेल्या उत्पन्नाचीआकडेवारी द्यावयाची आहे त्याची आकडेवारी आपणाकडे तयार असून याचेही १० गुण महानगरपालिकेस मिळेल.

**9) महानगरपालिकेतील कर्मचा-याना वेतन देणे. गुण - (५)**

महानगरपालिकेतील कर्मचा-यांना ५ तारखेपुर्वी पगार देता किंवा नाही.

महानगरपालिकेतील अस्थापनेवर असलेल्या कर्मचा-यांना त्यांचे मासिक वेतन ५ तारखेपर्यंत द्यावयाचे आहे. राज्यातील इतर महानगरपालिका कर्मचा-यांना तीन-तीन महिणे वेतन देत नाही परंतु आपली महानगरपालिका कर्मचा-यांना नियमित वेतन देत आहे. मध्यंतरीच्या काळात उत्पन्न घटल्यामूळे वेतन उशिरा देण्यात आले होते परंतू या महिण्याचे वेतन ५ तारखेच्या आत देण्यात आलेले आहे. त्यामूळे आपणास याचेही ५ गुण मिळतील पगार देण्याचा प्रश्न नाही महानगरपालिका फायनान्सीयल डिसिप्लीन पाळते किंवा नाही.

**10) सन २०१२-२०१३ या वर्षातील लेखा परिक्षण गुण - (५)**

मुख्य लेखा परिक्षण विभागामार्फत दरवर्षी महानगरपालिकेच्या खर्च व उत्पन्नाचा अहवाल स्थायी समितीला सादर करण्यात येतो.सन २०१२-२०१३ या वर्षातील लेखा परिक्षण झालेले असून त्याचा अहवाल स्थायी समितीला सादर करण्यात आलेला आहे. .त्यानंतरच्या दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल देणे बाकी आहे. मुख्य लेखापरिद्विक्षक यांना लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीला सादर करण्यासाठी सांगण्यात आलेले आहे. याचेही पाच गुण महानगरपालिकेस मिळतील.

**11) Percentage contribution of Tax revenue ,fees and user charges,rent and other internal revenue sources to the ULB budgeted receipt गुण - (१०)**

महानगरपालिकेस शासनाच्या विविध योजने अंतर्गत विशेष प्रकल्पाकरीता जो निधी मिळाला त्याप्रकल्पावर( जेएनएनयुआरएम,बिएसयुपी) महानगरपालिकेने आपल्या विविध प्रकारच्या महसुली उत्पन्नातून किती टक्के खर्च केला .५० टक्के पेक्षा अधिक खर्च असेल तर १० मार्क ३५ ते ५०टक्के असेल तर ७.५ मार्क व २० ते ३५ टक्के असेल तर ५ व त्यापेक्षा कमी असेल तर ० मार्क

मोठे प्रकल्प असल्यामूळे अनुदानाची रक्कम जास्त आहे. यावर महानगरपालिकेने आपल्या उत्पन्नातून सरासरी २५-३० खर्च केलेला असून महानगरपालिकेचे उत्पन्न १५० कोटीचे असल्यामूळे आपण १० मार्क मिळविण्याचा प्रयत्न करु.

**12) मागील वर्षाच्या काळात पाणी पुरवठा योजनेवर झालेला खर्च व त्यापासून मिळालेले उत्पन्नाची टक्केवारी गुण - (१०)**

केंद्र शासनाची अशी अपेक्षा आहे की महानगरपालिकेची पाणी पुरवठा योजना ही ना नफा ना तोटा याधर्तीवर चालली पाहिजे. पाणी पुरवठा योजनावर जेवढा खर्च होतो त्यांच्या ८० टक्के पाणी पटीपासून उत्पन्न मिळत असेल तर १० मार्क ,६० ते ८० टक्के असेल तर ७.५ मार्क व ४० ते ६० टक्के असेल तर ५ मार्क व त्यापेक्षा कमी असेल तर ० मार्क

नांदेड महानरपालिकेचा पाणी पुरवठा योजनेवर जवळपास १३ ते १४ कोटी रुपये खर्च होता व त्यापासुन जवळपास १० ते ११ कोटीची उत्पन्न मिळते. आज जवळपास खर्चाचे ८० टक्के उत्पन्न महानगरपालिकेस मिळते.महानगरपालिकेने दरवर्षी पाणी पटीत १० टक्केने वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.सध्या आपण १८०० रुपये पाणी पटी आकारतो. पुढील वर्षी आपली पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या धर्तीवर चालणार आहे.त्यामूळे यासही १० मार्क मिळतील.

**13) सन २०१४-२०१५ या वर्षाच्या कालावधीत महानगरपालिकेने स्वतःच्या उत्पन्नातून भांडवली कामाकरीता केलेल्या खर्चाची टक्केवारी.गुण -१०**

सालसन २०१४-२०१५ मध्ये महानगरपालिकेने आपल्या महसुली उत्पन्नातून भांडवली कामावर किती टक्के खर्च केला २० टक्के खर्च केला असेल तर १० गुण १० ते २० टक्केला ७.५ गुण व ५ ते १० टक्के असेल तर ५ गुण व त्यापेक्षा कमी असेल तर ० गुण. नांदेड महानगरपालिकेने आपल्या स्वतः उत्पन्नातून नगसेवक स्वेच्छानिधी,वार्ड विकास निधी अंतर्गत विविध भांडवली कामावर, तसेच इमारतीच्या बांधकामावर महसुली उत्पन्नाच्या ५० टक्के पेक्षा अधिक खर्च केलेला असल्यामूळे या कामावर आपणास १० मार्क मिळतील.

**14) जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत केलेल्या सुधारणा (रिफार्म) पुर्तता गुण-१०**

केंद्र शासनाने २००६ मध्ये जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेत नांदेड शहराचा समावेश झाल्यानंतर जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत केंद्र शासना बरोबर राज्य शासन, महानगरपालिका यांच्यामध्ये जो त्रिसदस्यी करार झाला होता या करारातील अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेस सुधारणा कार्यक्रमासह चार रिफार्म दिले होते १) मालमत्ता करात सुधारणा करणे २) व्दी नोंद लेखा पध्दत सुरु करणे ३) पाणी पुरवठा योजना रिफार्म करणे. ४) ई- गर्व्हनर्स

महानगरपालिका हध्दतील नागरीकांना असमानतेने मालमत्ता कर लावण्यात आला होता त्यामूळे सर्व मालमत्ता धारकांना समानतेने कर आकारण्यासाठी राज्य शासनाने रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यसाचे निर्देष दिले होते त्यानुसार महानगरपालिकेने रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यास मान्यता दिली व मागील दोन वर्षापासुन रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची वसुली करण्यात येत आहे. यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नातही वाढ झाली व सर्वाना समानतेने मालमत्ता कराची आकारणी झालेली असल्यामूळे नागरीकांच्या मनातील नाराजी दुर झालेली आहे.राज्य शासनाने रेडी रेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकरणी केल्यामूळे आपल्या महानगरपालिकेस विशेष अनुदानही दिलेले आहे. मागील दोन वर्षापासुन व्दिनोंद लेखा पध्दत सुरु करण्यात आलेली असून त्यामधील दुसरा भाग आहे महानगरपालिकेचे संपूर्ण कामकाज व जमा खर्चाचा हिशोब दररोज ऑनलाईन करुन त्यांच्या नोंदी डे टू डे इन्टीग्रेट करणे हे काम बाकी आहे, नागरीकांना पाणी पट्ी युजर चार्जेस ,गार्बेज चार्जेस आकारीतअसुन तो वसुल करीत आहोत.ई गर्व्हनर्स अंतर्गत नागरीकांना पारदर्शक पणे सेवा सुविधा उपलब्द करुन देण्याचा प्रकल्प सुरु केलेला आहे यामूळे राज्य शासनाकडून या महानगरपालिकेस गोल्ड मेडलही मिळालेले आहे. तसेच ऑफसनल १० रिफार्म होते जसे वाटर हार्वेस्टर स्किम राबविणे, डिसी तयार करणे ई.हेही रिफार्म आपण पुर्ण केलेले असून केंद्र शासनाने नियुक्त केलेले कन्सलटंट ऑस्की, आंन्ध प्रदेश यांनी प्रत्यक्ष येवून रिफार्मची तपासणी करुन केंद्र शासनास कम्प्लेशन प्रमाणपत्र ही दिलेले आहे.

**15) जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मंजुर असलेल्या प्रकल्पापैकी मार्च २०१२ पर्यत पुर्ण केलेल्या प्रकल्पाची टक्केवारी,गुण-१०**

केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत आपल्या महानगरपालिकेचे ११ प्रकल्प मंजुर केले होते त्यापैकी १० प्रकल्पाची कामे २०१२ पुर्वी पुर्ण केलेली असून त्यातील एक प्रकल्प दरबार मस्जीद ते किल्ला या ३४० मिटरचा रस्त्याचे काम एका जागेच्या भुसंपादनाच्या अडचणीमूळे शिल्लक आहे याचे जवळपास ९० टक्के काम पुर्ण झालेले आहे ही बाब येणा-या समितीच्या निदर्शना आणून देण्यात येईल .राज्याचे या खात्याचे सचिव ईमामअली यांनी केंद्र शासनास प्रकल्प पुर्ण झाल्याचा अहवाल ही दिलेला आहे. याचेही पुर्ण १० मार्क मिळण्याची शक्यता आहे.

मागील ५-६ वर्षात गुरु ता गद्दी अंतर्गत जेएनएनयुआरएम,बिएसयुपी ची चांगली कामे केलेली असल्यामूळे महानगरपालिकेचा दावा मजबुत झालेला आहे. या संदर्भात राज्य शासनाने १जूलै २०१५ रोजी जी.आर काढून राज्यातील ४४ स्थानिक संस्थांना प्रपत्र-२ तयार करुन ठेवण्यास सांगितलेले आहे.तसेच अतिरिक्त मुध्दाची माहिती तयार करुन ठेवण्याचे सांगितलेले आहे त्यामध्ये

१) संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्टसिटी अभियान अंतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभा करु शकेल याबाबतचा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षमतेचा व नियोजनाचा तपशिल द्यावयाचा आहे.

२) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करु शकेल याबबत संबंधित नागरी स्थानिक संस्थेच्या कार्यकारी क्षमतेचा व नियोजना तपशिल महागनरपालिकेकने मागील ४-५ वर्षात

जेएनएनयुआरएम व बिएसयुपी योजने अंतर्गत ५००-६०० कोटी निधीचा खर्च केलेला आहे त्यामूळे या ठिकाणी आपली क्षमता सिध्द झालेली आहे.

३) स्मार्टसिटी अभियान मध्ये नागरीकांचा सहभागाबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नियोजन काय आहे याबाबतचा अहवाल द्यावयाचा आहे.

४) स्मार्ट सिटी अमलबजावणी बाबतचा संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा दुरदृष्टीकोन (विजन) यामध्ये पुढील २५ वर्षात शहरातील परिस्थितीचा अभ्यास करुन कोणत्या क्षेत्रात शहराला बनवावायाच आहे शिक्षण, हॉस्पीटीलीटी, आयटी, औद्योगिकरण हे व्हिजन ठरवावयाचे आहेत.

मागील ५-६ वर्षात शहरातील नागरीकांनी दिलेल्या प्रतिसादामूळे ,महानगरपालिकेतील पदाधिकारी अधिकारी,कर्मचारी यांनी केलेल्या मेहनतीमूळे शहरात गुरु ता गद्दी अंतर्गत जेएनएनयुआरएम, बिएसयुपी ची अत्यंत चांगली कामे झालेली असल्यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा १०० शहरामध्ये निवडीचा दावा मजबुत झालेला आहे.राज्याला स्मार्टसिटी करीता स्पर्धात्मक पध्दतीने १० शहराची निवड करावयाची असल्यामूळे राज्याची समिती महागनरपालिकेची तपासणी करुन आपला अहवाल राज्य शासनास सादर करील व राज्य शासना मार्फत १० शहराचे नावाची शिफारस केंद्र शासनास होईल. प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करुन केंद्र शासन स्मार्ट सिटीची निवड जाहीर करील.हा पहिला टप्पा आहे त्यानंतर विकास आराखडा तयार करावयाचा आहे. हा विकास आराखडा केंद्र शासनाने निश्चित केलेल्या कन्सलटंट कडून किंवा निविदा मागवून निश्चित केलेल्या कन्सलटंटकडून तयार करावयाचा आहे. कन्सलटंट शहराची पाहणी करुन करुन कोणकोणत्या भागात नागरी सुविधाचा गॅप आहे. त्याचा दर्जा काय आहे कोणत्या लेव्हलवर दर्जा घेवून जावयाचा याचा पुर्ण अभ्यास करुन प्रकल्प अहवाल तयार करतील व सदरचा प्रकल्प अहवाल महासभेसमोर येईल.महासभेनेही प्रकल्प अहवालावर अभ्यास करुन त्यासमान्यता द्यावयाची आहे.महासभेने मान्यता दिल्यानंतर प्रकल्प अहवाल राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर होईल केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अमलबजावणी करण्यास सुरवात होइल. शासनाने स्थानिक संस्थांना स्मार्टसिटीचे मॉडेल निवडण्याचे पुर्ण स्वातत्र दिलेले आहे. १) अस्तित्वात असलेल्या शहरात सुधारणा( रिट्रोफिटींग)करणे,२) शहरातीलज्या भागात कोणत्याच प्रकारच्या सुविधा नाहीत अशा अति मागासलेल्या भागाचा पुर्नविकास करुन त्याच धर्तीवर शहरातील इतर भागाचा विकास करणे.३) महानगरपालिका हध्दीतील असदवन, असर्जन ,कौठा, तरोडा, ब्रम्हपुरी या भागातील २५० एकर असलेल्या खुल्या जागेत नविन स्मार्ट शहर बसविणे व त्या प्रमाणे शहरातील इतर भागात सुविधा उपलब्न्द करुन देणे किंवा तिन्ही मॉडेलचे एकत्रित करुन स्मार्टसिटी करता येईल मांडेल निवडण्याचे पुर्ण अधिकार स्थानिक स्वराज्य संस्था यांना देण्यात आलेले आहे.या शिवाय आपणास काही शंका असल्यास त्यां सांगाव्यात त्याचे समाधान करण्यात येईल.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त यांनी स्मार्ट सिटी बाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच पुस्तक पण दिलेले आहे.यापुर्वी सुध्दा २००६ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी तथा प्र.आयुक्त श्री मोपलवार साहेबांनी जेएनएनयुआरएमचा प्रस्ताव या सभाग्रहात मांडला होता. केंद्रशासनाने जेएनएनयुआरएममध्ये समावेश होण्यासाठी ज्या शहराची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त आहे अशाच शहराची निवड करण्याचा निर्णय घेतला होता.परंतु गुरु-ता-गद्दीची पाश्वभुमी लक्षात घेवुन त्यावेळचे पंतप्रधान मा.डॉ.श्री मनमोहनसिंघजी यांनी विशेष बाब म्हणून नांदेड व अजेमेर शहराची जेएनएनयुआरएममध्ये निवड केली होती. तसेच महानगरपालिके करीता स्वत:चा वाटा म्हणून २५ टक्के सहभाग नोंदवायचा होता. त्यामध्येही केंद्र शासनाने विशेष बाब म्हणुन नांदेउ शहराकरिता आपला १० टक्के सहभाग नोंदविण्याचा निर्णय घेतला होता. स्मार्ट सिटीमध्येही महानगरपालिकेस आपला २५ टक्के सहभाग नोंदवायचा आहे. नांदेड ही श्री गुरु गोविंदसिंघजी यांची नगरी असल्यामुळे केंद्र शासनास या महानगरपालिकेस सहभागात सुट देण्याबाबत विनंती करता येईल. महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी त्यावेळेसचे महापौर, उपमहापौर हे सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी नागरीक खुप मेहनत घेवुन गुरु-ता-गद्दी अंतर्गत जेएनएनयुआरएम ची कामे पुर्ण केली आहेत त्यामुळेच आपण स्मार्ट सिटी स्पर्धेत भाग घेण्यासाठी आज सक्षम झालेलो आहोत. त्यामुळे या सर्वाचे अभिनंदन करण्यास हरकत नाही असे मला वाटते. स्मार्ट सिटी मध्ये समावेश होण्यासाठी काय करावे लागेल, कश्या प्रकारे मार्क मिळतील हे रत्नाकर साहेबांनी सांगीतलेले आहे. केंद्र शासना मार्फत शहरातील नागरीकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात शहराचा विकास व्हावा या दृष्टीने मा.पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी स्मार्ट सिटी योजना जाहिर केलेली आहे. जेएनएनयुआरएम मध्ये समावेश होण्यासाठी केंद्र शासनाने जे रिफार्म दिले होते त्याची महानगरपालिकेने पुर्तता केलेली असून रेडी रेकनर प्रमाणे

मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. ई-गवनर्स ची सेवा सुरु करण्यात आलेली आहे. पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालण्यासाठी एस.पी. व्ही या कंपनीची स्थापना करण्यात आली. स्मार्ट सिटीचा समावेश झाल्यानंतर जी कामे करावयाची आहेत ती सर्व कामे एसपीव्ही मार्फत होणार असल्याचे देण्यात आलेल्या पुस्तकावरुन दिसुन येते. यापुर्वी केंद्र शासनाचे जेएनएनयुआरएम योजनेतील सर्व विकास कामे महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे परंतु स्मार्ट सिटी मध्ये करावयाची सर्व कामे ही एसपीव्ही मार्फत करावयाची असुन एसपीव्ही मध्ये केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी महानगरपालिकेचे महापौर, आयुक्त हे राहणार आहेत. निवड झालेल्या सर्व विकासाची कामे एस पी व्ही मार्फत होणार असल्यामुळे व नागरीकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत व शहराचा विकास होणार आहे. त्यामुळे आमचे शहर तुमचे शहर असा भेद न करता स्मार्ट सिटीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास आम्ही एकमताने  मान्यता देत आहोत स्मार्ट सिटीमध्ये १०० शहराची निवड ही स्पर्धात्मक पध्दतीने होणार असुन नांदेड महानगरपालिकेने आजपर्यंत जेएनएनयुआरएम, नगरोत्थान दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामामुळे इतर महानगरपालिकेच्या तुलनेत नांदेड महानगरपालिका १ नंबरवर आहे. त्यामुळे नांदेड शहराची स्मार्ट सिटीमध्ये निवड होणारच आहे. यामध्ये एक शंका येते प्रस्तावात महापौर व आयुक्त यांना अधिकार देण्याची मागणी करण्यात आलेली आहे, परंतु यापुर्वी प्रशासनामार्फत असे अधिकार देण्याचा प्रस्ताव सभागृहात कधीही आलेला नव्हता, परंतु सभागृहात चर्चा होवुन विषयाचे गांर्भिय व जनहित लक्षात घेवुन परिस्थतीनुसार मागणी नुसार अधिकार देण्याचा निर्णय महासभेने घेतलेला आहे. त्यामुळे या प्रस्तावात इतरांना अधिकार देण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते फक्त स्मार्ट सिटीमध्ये नांदेड शहराचा समावेश होण्यासाठी जी काही कार्यवाही करावयाची व यासाठी जी कागदपत्रे सादर करावयाची त्यासाठीचे अधिकार ३० तारखेपर्यंत महापौरांना देण्यात यावे. शहराची स्मार्ट सिटीमध्ये निवड झाल्यानंतर स्मार्ट सिटीच्या संदर्भात जे काही निर्णय घ्यावयाचे आहे ते संबंधित प्राधिकरणाच्या समोर ठेवुन निर्णय घेण्यात यावेत. स्थायी समितीचे अधिकार असतील तर स्थायी समितीकडे व महासभेचे अधिकार असतील तर महासभेसमोर ठेवुन निर्णय घेण्यात यावेत.

**अनुजा तेहरा** स्मार्ट प्रस्ताव स्मार्ट सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे. श्री रत्नाकर वाघमारे,उपआयुक्त यांनी स्मार्टसिटीचे निकष काय आहेत व त्या निकषाची आपण कशा प्रकारे पुर्तता करु शकतो याबाबत सविस्तर माहिती सभागृहास  दिलेली आहे. यापुर्वी जेएनएनयुआरएम ,बिएसयुपी,नगरोत्थान या महत्वकाक्षी योजनांना  याच सभागृहाने मान्यता दिली होती आणि या योजनेची अमलबजावणीही याच सभागृहाने अधिका-याच्या मदतीने यशस्वीरित्या पुर्ण केलेली आहे.त्यावेळेस यायोजना पुर्ण करण्यासाठी महाननगरपालिकेचे अधिकार काढुन इतर कोणत्या पदाधिका-यांना अधिका-यांना दिले होते काय याबाबत त्यावेळेसचे स.सदस्य श्री अ.सत्तार, श्री सरजितसिंघ गिल,श्री विरेद्रसिंघ गाडीवाले यांनी सांगावे. महापौर व आयुक्तांनी याबाबतीत खुलासा करावा. शासनाच्या जेएनएनयुआरएम ,बिएसयुपी,नगरोत्थान या योजनेची यशस्वीपणे अमलबजावणी झालेली असतांना स्मार्टसिटी योजनेचे अधिकार महापौर व आयुक्त या दोनच व्यक्तीना देण्यासाठी कसा काय प्रस्ताव देण्यात आलेला आहे. आमच स्मार्ट सिटीच्या प्रस्तावास विरोध नाही आम्ही या प्रस्तावास उत्सर्फुतपणे पाठींबा देत आहोत, परंतु महापौर व आयुक्तांना अधिकार देण्याचा प्रस्ताव आम्हाला अमान्य आहे. महासभा ही सर्वोच्च सभा असल्यामुळे आमचे अधिकार हिरावुन महापौर व आयुक्तांना कसे काय बहाल करण्यात येत आहेत. महासभेचे अधिकार कायम करण्यात यावे व नांदेड शहराची स्मार्ट सिटीमध्ये निवड झाल्यानंतर या संदर्भात जे काही निर्णय घ्यावयाचे ते सर्व निर्णय महासभेपुढे ठेवुन निर्णय घेण्यात यावेत. महासभेने मान्यता दिल्याशिवाय पुढील कार्य करण्यात येवु नये. अधिनियमातील तरतुदीनुसार सर्वोच्य अधिकार कोणाला आहेत याबाबत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**दिपकसिंह रावत** श्री रत्नाकर साहेबांनी स्मार्ट सिटी बाबत माहिती देतांना बोलता बोलता सांगीतले की ग्रीन बेल्ट सिटी उभारण्यासाठी जागा पाहावी लागेल. मला आयुक्त साहेबांना विचारावयाचे आहे की महानगरपालिका अधिनियमातील कलम 270 प्रमाणे अधिसुचना काढली आहे काय स्मार्ट सिटी अंतर्गत विचारण्यात आलेली १३ प्रश्नांची उत्तरे दयावयाची आहेत. श्री रत्नाकर साहेबांनी जी उत्तरे सांगीतली ती बरोबर आहे काय व या उत्तरानुसार आपण नि:पक्षपणे स्मार्ट सिटी मध्ये जाऊ शकतो काय कारण प्रथम महानगरपालिकेने अधिनियमातील कलम २९ अ नुसार प्रभाग समित्या कायम करणे आवश्यक आहे. मागच्या सर्व साधारण सभेत ६ झोनचे ४ झोन करण्याचा प्रस्ताव आला होता, त्यावेळी प्रभाग समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेणे आवश्यक होते. महापौर व आयुक्तांनी स.सदस्यांना लेखी पत्र देवुन आपल्या प्रभागातील नागरीकांची बैठक घेवुन २५-२५ नागरीकांच्या स्वाक्ष-या आणाव्यात असे कळविले आहे. मी घरात बसुन नागरीकांच्या सहया आणुन देतो ते चालेल का आम्हाला अशा ठरावावर नागरीकांच्या सहया घेण्याचे अधिकार आहे काय

हे प्रभाग समित्याचे अधिकार आहे. असे चुकीचे नागरीकांच्या सहयाचे ठराव घेवुन शासनाची दिशाभुल कशाकरिता करायची महानगरपालिकेची बाजु काय आहे की वस्तुस्थितीला धरुन मांडावयास पाहिजे. उद्या स्मार्ट सिटी बाबत काही निघाले तर केंद्रात राज्यात भाजप-शिवसेनेची सत्ता आहे. बोगस ठराव केल्याची चर्चा होवुन नगरसेवकांची, शहराची महानगरपालिकेची बदनामी होईल. अनेक दिवसापासुन वर्तमानपत्रात दलित वस्तीच्या, प्रशासनाच्या विरोधात बातम्या प्रसिध्द होत आहेत. अधिकारी नागरीकांमध्ये व पदाधिकारी प्रशासनामध्ये मतभेद वाढत आहेत. यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा नागरीकांमध्ये कशी राहील. नांदेड शहरांचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश व्हावा अशी आमची मागणी आहे, परंतु प्रशासन व पदाधिकारी यांनी आपले आपसातील मतभेद मिटविणे आवश्यक आहे तरच आपण या स्पर्धेत टिकु शकु. राज्यात व केंद्रात भाजप-शिवसेनेची सत्ता असुन स्मार्ट सिटीच्या संदर्भात महानगरपालिकेने पारित केलेले ठरावावर शासन स्तरावर पाठपुरावा करण्याकरिता सत्ताधारी पक्षाचे स्थानिक आमदार श्री हेमंत पाटील पालकमंत्री मा.ना.श्री दिवाकररावजी रावते यांचे सहकार्य घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना विश्वासात घ्यावे जेणेकरुन ते ही नांदेड शहरांचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यासाठी राज्य व केंद्र स्तरावर पाठपुरावा करतील श्री सरजीतसिंघ गिल यांनी प्रभागातील अबचलनगर भागात टाकण्यात आलेली चिनी मातीची पाईप लाईन बदलण्यासाठी वारंवार सभेत मागणी केलेली आहे, परंतु आजपर्यंत ती बदलण्यात आलेली नाही. स्मार्ट सिटीच्या स्पर्धेत भागघेण्यास आम्ही एकमताने कंडीशनल मान्यता देतो. यामध्ये महापौर व आयुक्तांना कोणत्याच प्रकारचे अधिकार देण्यात येवु नये अशी आमची मागणी आहे. स्मार्ट सिटीचे पुर्ण प्रस्ताव सर्व साधारण सभेत आणावेत. आयुक्त साहेबांना विनंती आहे की आपण चांगली कामे करतात त्यामुळे शहरात आपली प्रतिमा चांगली आहे, परंतु काही ठिकाणी आपणाकडुन चुका होतात त्या होवु नये आणि स्मार्ट सिटीचा प्रकल्प बारगळु नये याचे प्रिकाशन घ्यावे अशी विनंती आहे.

**विनय पाटील** आज अतिशय महत्वाच्या विषयावर महापौरांनी विशेष सभा बोलावली आहे. स्मार्ट सिटीचा ठराव करुन शासनास सादर करावयाचा आहे. श्री रत्नाकर वाघमारे यांनी स्मार्ट सिटीची प्रस्तावना विस्तृत मांडली आहे त्यांनी सन्माननीय सदस्य काय विचारतील ते अगोदरच आपले स्पष्टीकरण दिले असल्यामुळे स.सदस्यांना प्रश्न मांडण्याची संधी दिलेली नाही. देशाची राष्ट्रभाषा ही हिंदी असतांना आम्हाला इंग्रजीचे पुस्तक दिले आहे, परंतु हे मला माहित होते म्हणुन अगोदरच संकेतस्थळावरुन हिंदी भाषेतील शासन निर्णय (पुस्तक) काढुन घेतले कारण ही खुप मोठी योजना असल्यामुळे या योजनेचे स्वरुप काय आहे कोणकोणत पार्ट आहेत याची माहिती असणे आवश्यक आहे सदरील निर्णय वाचल्यानंतर त्यामध्ये दोन गोष्टी दडलेल्या आहेत. सभागृह नेत्यांनी सांगीतले आहे की स्मार्ट सिटी अंतर्गत जी काही विकास कामे होणार आहेत ती सर्व कामे एसपीव्हि मार्फत होणार आहेत, परंतु शहरातील नागरीकांकरीता चांगली योजना मिळत असेल तर सभागृहातील स.सदस्य, शहरातील नागरीक कोणीही ना म्हणणार नाही. माझी ही ईच्छा आहे की ही योजना नांदेड शहराला मिळाली पाहिजे. स्मार्ट सिटी मध्ये स्पर्धात्मक पध्दतीने १०० शहराची निवड करण्यात येणार आहे, परंतु महानगरपालिकेतील सध्याची परिस्थिती पाहिली तर प्रशासन – पदाधिकारी, पदाधिकारी-पदाधिकारी यांच्यामध्ये मतभेद होत आहेत. जर अशीच परिस्थिती राहीली तर आपण स्मार्ट सिटीच्या स्पर्धेत टिकु शकणार नाही. आपसात मतभेद होवु नये असे मला वाटते. महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुशिल खोडवेकर हे आयएएस अधिकारी आहेत. यापुर्वी त्यांच्यासारखेच आयुक्त डॉ.श्री म्हैसेकर साहेब, डॉ.श्री निपुण विनायक, श्री जी.श्रीकांत व श्री निशिकांत देशपांडे यांच्याबरोबर आम्ही कामे केलेली असुन त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने प्रशासन चालविले आहे. आपणाकडून सुध्दा तशाच प्रकारे चांगली कामे होतील अशी अपेक्षा करतो. जेएनएनयुआरएम/बीएसयुपी व नगरोत्थान अंतर्गत अनेक कामे अर्धवट राहीलेली आहेत ती कामे पुर्ण करणे आवश्यक आहे ती कामे पुर्ण केली तर आपणास वाढीव गुण मिळु शकतील श्री रत्नाकर साहेबांनी नळ कनेक्शनला मिटर लावण्याची मागणी केली होती त्यानुसार काही भागात मिटर लावण्याची मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु अद्याप मिटर बसविण्यात आलेले नाहीत. नागरीकांनी तक्रार केल्यानंतर त्यांच्या तक्रारांची पुर्तता करण्यासाठी स्वीमींग पुल येथे तक्रार निवारण केंद्र सुरु करण्यात आले होते, परंतु नंतर ते बंद करण्यात आले आहे ते सुरु करण्यात यावे व नागरीकांनी तक्रार केल्यानंतर त्यांच्या तक्रारींचा निपटारा तात्काळ झाला पाहिजे. अशा गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. स्मार्ट सिटी करिता स्वत:चा वाटा भरण्यासाठी दरवर्षी रु.५० कोटी बाजुला काढावे लागणार आहे. त्यादृष्टीने उत्पन्नाचे नियोजन करावे लागणार आहे. एलबीटीचे उत्पन्न पाहिले असता मागील वर्षाच्या तुलनेने रु.६ कोटीने कमी झाले आहे. जुन मध्येही रु.६ कोटीने उत्पन्न कमी झालेले आहे ते कशामुळे कमी होत आहे. यासंदर्भात पेपरमध्ये ज्या बातम्या प्रसिध्द होत आहेत त्या बातम्या ख-या आहेत की काय अशी शंका येते. प्रशासन व अधिकारी यांच्यामध्ये आपसात मतभेद असतील तर आपण या स्पर्धेत टिकु शकणार

नाही. आपली अकरा माणसाची टिम आहे तशीच इतर शहराची सुध्दा अकरा माणसाची टिम आहे. महापौरांना विनंती आहे की आपसातील थिकनेस दुर केले पाहिजेत तरच आपण स्पर्धेत टिकु शकु. नागरीकांनी आम्हाला नेमणुक दिलेली आहे. प्रभागाची निवडणूक कशी होते याची सर्वाना कल्पना आहे. जो व्यक्ती आपल्या प्रभागाचा विकास करु शकतो त्यांनाच नागरीक निवडुन देतात. त्यामुळे प्रत्येक नगरसेवकांना आपल्या प्रभागाचा विकास झाला पाहिजे असे वाटते. नगरसेवक आपले व्यक्तीगत घरचे किंवा हद्यीबाहेरचे काम सुचवित नसुन त्यांच्या प्रभागातील कामे सुचवित असतात. त्यामुळे त्यांनी सुचविले कामे विविध विकास योजने अंतर्गत झाली पाहिजे असे आम्हाला वाटते. स्मार्ट सिटी योजनेमुळे नांदेड शहराचा विकास होणार आहे व नागरीकांनाही चांगल्या सुविधा मिळणार असल्यामुळे या योजनेच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी मान्यता देत आहोत. श्री रत्नाकर वाघमारे यांनी मार्क कसे मिळणार आहेत एवढेच सांगीतले आहे, परंतु एसपीव्ही मार्फत कामे कशा पध्दतीने होणार आहेत यांची माहिती दिलेली नाही या कामाचे नियोजन कसे राहील, आर्थिक नियोजन कसे राहील याचे अधिकार एसपीव्हीला असतील तर महानगरपालिकेचे आस्तित्व राहील काय स्थानिक संस्थेचे अधिकार एसपीव्हीकडे जात असतील तर संस्थेच्या अधिकारावर गदा येणार आहे. एसपीव्हीच्या बाबतीत खुलासा करण्यात यावा. श्री रत्नाकर वाघमारे यांनी महानगरपालिका हद्यीतील खुल्या असलेल्या २५० एकर जागेत नविन शहर वसविता येईल असे सांगीतले आहे. त्याप्रमाणे नविन शहर बसविण्यासाठी जागेची पाहणी करुन जागा निश्चीतीची कार्यवाही करण्यात यावी. महापौरांना विनंती आहे की मी सांगीतलेल्या गोष्टीचा विचार करावा.

**रामनारायणजी काबरा** — पुस्तकात स्मार्ट सिटी योजने अंतर्गतची कामे एसपीव्ही मार्फत करण्यात येतील असा उल्लेख आहे. एसपीव्हीला सर्व अधिकार जात असतील तर महानगरपालिकेचे आस्तीत्वच राहणार नाही. तरी एसपीव्हीचा खुलासा करण्यात यावा.

**स.शेर अली** — स्मार्ट सिटीचा जो प्रस्ताव आलेला आहे त्यास आमचे पुर्ण समर्थन आहे. ज्या योजनेच्या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचे अधिकार व चार मॉडेल निवडण्याचे अधिकार केंद्र शासनाला, एसपीव्हीला की महापौर – आयुक्तांना राहणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**श्रध्दा चव्हाण** — सभा सुरु झाल्यापासुन माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले होते ते विचारावे की नाही असा मनात संभ्रम होता. सभागृह नेता श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले व दिपक भय्या यांनी खुप गंभीर प्रश्न उपस्थित केले आहे शासनाने विविध योजने अंतर्गत जी विकासाची कामे मंजुर केलेली आहेत ती खरोखरच १०० टक्के पुर्ण झाली आहेत का शहरातील अनेक भागातील विकासाचे प्रश्न प्रलंबीत आहेत. माझ्याही प्रभागातील प्रश्ने आहेत शहरातील नागरीकांना सुख समृध्दीच्या जीवनावश्यक गोष्टी पुरवावयाच्या आहेत त्या व्यवस्थीत पुरविण्यात याव्यात. सभागृहात स्मार्ट सिटीचे अधिकार आयुक्त व महापौरांना देण्याचा प्रस्ताव आलेला आहे. सभागृहाचे लक्ष वेधु ईच्छिते की परवा मी आयुक्त साहेबांकडे माझ्या प्रभागातील रस्त्यावर मुरुम टाकण्याच्या संदर्भात गेले होते, तेव्हा त्यांनी मला आपला प्रश्न लेखी दयावा असे सांगीतले. मी यापुर्वीही आपणास संबंधीत अधिकारी श्री बाशेट्टी यांना दिलेले आहे. नगरसेवकांने दिलेले पत्र टेबलावर ठेवायचे किंवा इतरत्र टाकावयाचे असे बोलले असता त्यांनी माझे वय नाही असे म्हटंले म्हणजे याचा अर्थ ते काम करण्यास समर्थ नाहीत. जेव्हा ते स्वतःच असे सांगत असतील तर एवढया मोठया स्मार्ट सिटीचे योजनेचे अधिकार त्यांना देणे कितपत योग्य आहे. सध्या कोणत्याच नगरसेवकांची कामे होत नाहीत. माझ्या प्रभागातील काहीच कामे होत नाहीत. महिलांना ग्राउंडलेवलवर कामे करावी लागतात. महिलांच्या कामावर आयुक्तांनी लक्ष दयावयास पाहिजे.

**महापौर** — केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेच्या स्पर्धेत भागा घ्यावयाचा किंवा नाही याबाबत निर्णय घेण्यासाठी आजची विशेष सभा बोलाविण्या आलेली असून यास्पर्धेत भाग घेण्याचा निर्णय झाल्यानंतर यास्पर्धेकरीता राज्य/केंद्र शासनास जी काही कागपत्रे सादर करावी लागणार आहे त्या कागदपत्राची पुर्तता करुन शासना सादर करण्यासाठीचा अधिकार देण्याचा प्रस्ताव आहे त्यामूळे स्मार्टसिटीच्या विषयाशिवाय इतर विषयावर स.सदस्यांनी चर्चा करु नये. केंद्र शासने स्मार्टसिटी योजनेत नांदेड शहराची निवड केल्यानंतर रितसर अधिनियमाचे तरतूदीनूसार स्मार्टसिटीचे सर्व प्रस्ताव महासभेसमोर ठेवून त्यावर निर्णय घेण्यात येईल.

**(यानंतर बराच वेळ सभागृहात गोंधळ चालु होता त्यामुळे कोण स.सदस्य काय बोलत होते हे समजत नव्हते.)**

**श्रध्दा चव्हाण** — महापौराना आयुक्ताना अधिकार देण्याचे विषयावरच मी बोलत आहे.

**अशोक उमरेकर** — कागदपत्राची पुर्तता करण्यासाठीच अधिकार द्यावयाचे याचा उल्लेख प्रस्तावात नाही.

**अ.सत्तार** — महिला नगरसेवकांचा अवमान कौन्सील सहन करणार नाही.

| | |
|---|---|
| **सरजितसिंघ गिल** | आजच्या विशेष सभेत मांडण्यात आलेल्या स्मार्ट सिटीच्या प्रस्तावाबाबत सभागृह नेते श्री विरेंद्रसिघ गाडीवाले माजी विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांनी अत्यंत महत्वाच्या सुचना केलेल्या आहेत त्यानुसार स्मार्ट सिटीमध्ये जाण्याचा प्रयत्न करावा या प्रस्तावास एक मताने मान्यता दयावी. महापौर व आयुक्त यांनी सर्व सदस्यांना एक पत्र देवुन प्रभागातील नागरीकांची बैठक घेवुन २५-२५ नागरीकांच्या सहया आणाव्यात असे कळविले आहे. श्री दिपकसिंह रावत यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेने आजपर्यंत प्रभाग समित्या स्थापन केलेल्या नाहीत असे सांगीतलेले आहे. त्यामुळे लवकरात लवकर या समित्या स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. श्री दिपकसिंह रावत यांनी या सभागृहास जागवण्याचे काम केलेले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. नांदेड महानगापालिकेस स्मार्ट सिटी स्पर्धेत भाग घेण्याची जी संधी मिळाली आहे ती कशामुळे मिळाली आहे केवळ गुरु-ता-गद्दीमुळे मिळालेली आहे. केंद्र शासनाने नांदेड शहराचा विकास करण्यासाठी जेएनएनयुआरएम/ बीएसयुपी योजनेअंतर्गत २००० कोटीचा निधी दिला होता. कोटयावधी रुपयाचा निधी देवुनही ज्या प्रमाणात गुरुदवारा परिसराचा कायापालट व्हावयास पाहिजे होता त्याप्रमाणात कायापालट झालेला नाही त्याचा मी निषेध करतो धिक्कार करतो. रोज वर्तमानपत्रात महानगरपालिके विरोधात बातम्या प्रसिध्द होत आहेत. जेएनएनयुआरएम शहरातील महत्वाचा शहिदे आजम भगतसिंघ या रस्त्याचे बोगस काम करुन वाट लावुन टाकली आहे. नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्यासाठी जी संधी मिळाली ती देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्यामुळे मिळाली असल्यामुळे देशाच्या १०० शहरामध्ये जाण्यासाठी निश्चितच प्रयत्न करावा. जेएनएनयुआरएम मध्ये या महानगरपालिकेचा समावेश होण्यासाठी त्यावेळेसचे जिल्हाधिकारी श्री मोपलवार, श्री म्हैसेकर त्यावेळेसचे खासदार भास्कररावजी पाटील, श्री आशोकरावजी चव्हाण, माजी आमदार श्री ओमप्रकाशजी पोकर्णा व जिल्हयाचे इतर नेते यांनी समर्थन दिले होते. जेएनएनयुआरएम मध्ये जाण्यासाठी वारंवार जिल्हयाचे तत्कालीन खासदार श्री भास्करावजी खतगावकर यांची स्वाक्षरी घ्यावी लागत होती. आता स्मार्ट सिटीमध्ये सहीची सुविधा नाही केंद्र शासनाचे मनात आले तर केंद्र शासन काहीही निर्णय घेवु शकते. श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सुचविल्याप्रमाणे प्रशासकीय अधिकार देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. त्याप्रमाणे ठरावात दुरुस्ती करण्यात यावी. सर्व सदस्यांना सन्मानाची वागणूक देण्यात यावी. जेएनएनयुआरएम योजने अंतर्गतची अर्धवट कामे राहीली आहेत ती पुर्ण करण्यात यावीत. भगतसिंघ रोडवर मोठा खड्डा पडला अशा बातम्या एमसीएनवर रोज देण्यात येत आहेत. या खड्डयात माणसे मेल्यानंतर तो रस्ता दुरुस्त करण्यात येणार आहे काय, जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत स्मार्ट सिटी अंतर्गत अशीच बोगस कामे करणार आहात काय जेएनएनयुआरएम योजने अतंर्गत टाकण्यात आलेली ड्रेनेज लाईनला चेंबरचे बांधकाम करण्यात आलेले नाही काही ठिकाणी लाईन टाकण्याचे सोडून देण्यात आलेली आहेत अशी बोगस कामे करण्यात आली केंद्र शासनाने निधी दिला आहे. श्री अ.सत्तार यांनी श्री गुरु गोविंदसिंघ यांच्या पुण्यायीने नांदेड शहरास २००० कोटीचा निधी मिळाल्याचे सांगीतले आहे. श्री गुरु गोविंदसिंघजी यांच्या गुरुग्रंथ मध्ये संतबाबा फरीद, संत रोहीदास, संत नामदेव आदी ३६ संताची वाणी आहे. संत नामदेव यांचा अंतिम संस्कार पंजाब राज्यातील घुमान येथे झाला होता. या ठिकाणास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नुकतेच भेट देवुन आले आहेत. गरुग्रंथ साहिबने संपुर्ण जगाला मानवतेचा संदेश दिला आहे. असे असतांना गुरुदवारा परिसरात बोगस ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहेत ही शरमेची बाब आहे. आम्ही हे केले ते केले त्यामुळे आम्हाला एवढे मार्क मिळतील अश्या मार्काची काय हैसीयत जेएनएनयुआरएम /बीएसयुपीची अर्धवट कामे करण्यासाठी केंद्र शासनाने दोन वर्षाची संधी दिलेली असल्यामुळे या योजनेतील सर्व अर्धवट कामे पुर्ण करण्यात यावीत. श्री दिपकसिंह रावत यांनी अबचलनगर भागात चिनी मातीची मल नि:सारण लाईन टाकण्यात आल्याचे सांगीतले. ही सर्व लाईन पुर्ण दबुन गेलेली आहे. |
| **अशोक उमरेकर** | श्री सरजितसिंघ गिल जे बोलले त्याचा आम्हाला अभिमान आहे. गुरु-ता-गद्दी निमित्ताने केंद्र शासनाने २००० कोटी रुपयाचा निधी देवुनही नांदेड शहराचा गुरुव्दारा परिसराचा विकास झालेला नाही. ही लाजीरवाणी गोष्ट आहे. मी आण्णाभाऊ चौक ते बाफना टी पॉईट हा रस्ता अत्यंत खराब झालेला असल्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी मागील दोन वर्षापासुन आयुक्तांना लेखी पत्र देत आहे, परंतु अद्याप रस्ता दुरुस्त झालेला नाही. आयुक्त साहेबांनी त्या रस्त्याची पाहणी सुध्दा केलेली आहे. हमालपुरा भाग हा संपुर्ण दलित वस्तीचा भाग असुन ही त्या भागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकासाची कामे होत नाहीत ही खेदाची बाब आहे. |
| **अ.सत्तार** | नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्यासाठी स्पर्धेत भाग घेण्याचे प्रस्तावास एकमताने मान्यता देण्यात यावी. स्मार्ट सिटीचा चार्ज श्री रत्नाकर वाघमारे यांना दिल्याबघ्दल त्याचे या सभागृहाचे वतीने मी अभिनंदन करतो. कारण त्यानी जेएनएनयुआरएम ची व बिएसयुपीची काम अत्यंग चांगल्या प्रकारे |

पुर्ण करुन महानगरपालिकेस केंद्र शासनाकडून पुरस्कार मिळवून दिलेले आहे,आणि त्यांनी केलेल्या कामामुळे आज महानगरपालिकेस स्मार्टसिटी मध्ये जाण्याची संधी मिळालेली आहे.श्री गिल यांनी जेएनएनयुआरएम व बिएसयुपीची अर्धवट राहिलेली कामे पुर्ण करण्याची सुचना केलेली आहे.आयुक्त साहेबाना विंनती आहे की यासर्व कामाची चौकशी करुन अर्धवट कामे पुर्ण करावेत. स्मार्टसिटी अंतर्गत नांदेड शहराचा समावेश झाल्यास महानगरपालिकेस आपलावाटा म्हणून दरवर्षी ५० कोटी बाजूला ठेवावयाचे आहे, नगरसेवकांच्या वार्ड विकास निधीवर याचा परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.वार्ड विकास निधी वर कोणताही परिणाम होणार नाही.स्मार्टसिटी व नगरसेवक वार्ड विकास निधी करीता वेगळया शिर्षकातन तरतुद करण्यात यावी. या सभागृहाने रिफार्म अंतर्गत रेडीरेकनर प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करण्यास मान्यता दिलेली असल्यामूळे महानगरपालिकेच्या उतन्नात मोठया प्रमाणात वाढ होवून १५० कोटीवर उत्पन्न गेलेले आहे. मराठवाडयातील औरंगाबाद,परभणी,लातूर या महागनरपालिकेपेक्षा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नंबर एक वर आहे. केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजनेमध्ये नांदेडचा समावेश करण्यासाठी तत्कालिन पंतप्रधान डॉ.श्री मनमोहनसिंघजी, आमचे नेते माजी मुख्यमंत्री खा.श्री अशोकरावजी चव्हाण,खा.श्री शरद पवार,माजी खासदार श्री भास्कररावजी पाटील खतगांवकर,माजी आमदार श्री ओमप्रकाशजी पोकर्णा याचे खुप मोठे योगदान राहिलेले आहे. तसेच तत्कालिन जिल्हाधिकारी श्री राधेश्यामजी मोपलवार,श्री म्हैसेंकर, यांचेही खुप मोठे योगदान राहिलेले .आम्हाला आठवते त्यावेळी श्री मोपलवार यांनी जेएनएनयुआरएम योजने प्रस्ताव जेव्हा केंद्र शासनास सादर करावयाचा होता त्यावेळी त्यांनी प्रस्तावासोबत जवळपास तीन क्वीटलचे कागदपत्र,फाईल्स मुंबई ते दिल्ली विमानाने नेले होते त्यांनी खुप मेहनत घेतली होती.केंद्र शासनाच्या अटी व शर्तीनुसार जेएनएनयुआरएम योजनेत समावेश झालेल्या सर्व शहराना आपला स्वत:चा २५ वाटा भरावा लागला परंतु ३०० सालाना गुरु ता गद्दी या धार्मीक कार्यक्रम निमित्याने विशेष बाब म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस २५ टक्के ऐवजी १० टक्के वाटा भरण्यासाठी सुट दिली होती त्याच धर्तीवर स्मार्टसिटी योजने अंतर्गत महानगरपालिकेचा २५ टक्के सहभाग कमी करुन सुट देण्यासाठी केंद्र शासनास विनंती करता येईल. जेएनएनयुआरएम ,बिएसयुपीची कामे विहित कालावधीत पुर्ण करण्यसाठी महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी ,कर्मचारी, यांनी खुप मेहनत घेतलेली आहे आणि त्यानी घेतलेल्या मेहनतीमूळेच आज आपण स्मार्टसिटीच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सक्षम ठरत आहोत. शहराचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाची स्मार्टसिटी ही एक चागली योजना आहे या योजनेमुळे नागरीकांना सर्व नागरी सुविधा मिळणार आहे याप्रस्तावास एकमताने आम्ही मान्यता देत आहोत. परंतु आमच्या अधिकारावर गदा येवू नये. महानगरपालिका अधिनियमान्वये आयुक्तांना खुप अधिकार देण्यात आलेले आहे त्यामूळे आयुक्तांना आमचे अधिकार देण्यास आमचा विरोध आहे. महापौर हे आमचे प्रतिनिधी असल्यामूळे आम्ही महापौर यांना अधिकार देत आहोत. स्मार्टसिटीच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी मान्यता देण्यात येते तसेच स्मार्टसिटीच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रस्तावा सोबत जी काही कागदपत्रे सादर करावी लागतील ती सर्व कागदपत्रे शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार महापौरांना देण्यात यावेत असा माझा प्रस्ताव आहे त्यास सभागृहाने मान्यता देण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**दिपकसिंह रावत** स्मार्टसिटी योजनेच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी. तसेच महापौरांना प्रस्तावाचे अनषंगाने आवश्यक ते कागदपत्र केंद्र शासनास सादर करण्याचे अधिकार महापौरांना देण्याचे प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**अशोक पाटील** श्री अ.स.सत्तार यांनी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री अ.सत्तार यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते .

**ठराव क्र. १९** **ठराव**

केंद्र शासनामार्फत देशभरातील नागरी शहराचा विकास करण्यसाठी स्मार्टसिटी योजना २५ जून २०१५रोजी घोषित करण्यात आलेली आहे. या योजनेत स्पर्धेव्दारे देशभरतील १०० शहराची निवड करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या निकषानूसार महाराष्ट्र राज्यातील एकूण १० शहरे निवडले जाणार आहे. या पुर्वी नांदेड शहराचा केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान योजनेमध्ये समावेश होता. या योजने अंतर्गत मंजुर झालेले सर्व प्रकल्प नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने यशस्वीरित्या पुर्ण पुर्ण केलेले असून जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान योजनेच्या निकषानुसार राबवावयाचे सुधारणा कार्यक्रमाखाली महानगरपालिकेने यशस्वीपणे राबविले असल्यामूळे या स्पर्धेत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा राज्यातील निवडल्या जाणा-या १० शहरामध्ये निश्चितपणे निवड होवू शकते, त्यामूळे केंद्र शासनाच्या स्मार्टसिटी योजनेच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी मान्यता देण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.२०** **Resolution**

The General Body of the Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded has unanimously resolved in special meeting dt. 7.7.2015 to participate in " Smart City Mission" competition as declared by Government of India on dt. 25th June, 2015.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येइल.

शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |